# दस्त नोंदणी

## Registration of Documents

- दस्त नोंदणी करण्याचा सर्वसाधारण अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल-

1. पक्षकारांनी त्यांच्या व्यवहाराचा लिखित व सही केलेला दस्त दुय्यम निबंधक यांचेसमोर हजर करणे (Presentation)

2.सदर दस्तावर सही केली असल्याचे त्यांनी स्वेच्छेने कबूल करणे (Admission) व

3.अशी कबुली देणारी व्यक्ती खरोखरीच तीच आहे व त्याने त्या दस्तावर सही केली आहे, याची दुय्यम निबंधक यांनी खातरजमा करणे (Identification) व

4.याप्रमाणे पूर्तता झाल्याची नोंद दस्तावर घेवून, दस्त नोंदणी केला असे दुय्यम निबंधक यांनी प्रमाणित करणे (Registration) व

5.याप्रमाणे पूर्तता झालेला दस्त, नोंदणी पुस्तकामध्ये अभिलिखित करणे (Copying) तसेच त्या दस्ताचा गोषवारा नमूद असलेली सूची (Index) तयार करणे.

थोडक्यात, दस्त नोंदणी करणे म्हणजे दस्तावर संबंधितांनी स्वत: जाणीव ठेवून सही केली असल्याची दुय्यम निबंधकानी खात्री करणे व तसे प्रमाणित करुन दस्त शासकीय अभिलेखात समाविष्ट करुन घेणे. तसेच दस्तामध्ये नमूद व्यवहाराची माहिती / नोटीस तमाम जनतेला माहितीसाठी उपलब्ध करुन देणे आणि त्याद्वारे व्यवहार करणा-यांचे हित संरक्षित करणे असाही सर्वसाधारण अर्थ सांगता येतो.

दस्त नोंदणीची कार्यवाही नोंदणी अधिनियम, 1908 या कायदयान्वये केली जाते. या कायदयातील तरतुदींच्या अनुषंगाने दस्त नोंदणीची सविस्तर कार्यपध्दती महाराष्ट्र नोंदणी नियम,1961 अन्वये ठरवून देण्यात आलेली आहे. दस्त नोंदणीसंदर्भातील अधिक माहीतीसाठी पहा याच संकेतस्थळावरील सारथी > FAQ > दस्त नोंदणी